अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १७ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ४८ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## फायनलला मोदी स्टेडियमवर स्वत: मोदी उपस्थित राहणार

**नवी दिल्ली** : टीम इंडियाने न्यूझीलंडचा %० धावांनी पराभव करत विश्वचषक २०२३ च्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या सामन्यात मोहम्मद शमीने शानदार गोलंदाजी करत सात विकेट्स घेतल्या. फायनलचा महामुकाबला १९ नोव्हेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे.

हा सामना पाहण्यासाठी पीएम मोदी स्वत: उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, न्यूझीलंडविरुद्ध सात विकेट घेत टीम इंडियाची फायनल निश्चित केलेल्या मोहम्मद शमीच्या गोलंदाजीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खूप कौतुक केले आहे. त्यांनी ट्विट करून शमीवर कौतुकाचा वर्षाव केला.

ते म्हणाले की, आजची उपांत्य फेरी अधिक खास बनली ती चमकदार वैयक्तिक कामगिरीमुळे. मोहम्मद शमीची शानदार गोलंदाजी क्रिकेटप्रेमींच्या भावी पिढ्यांच्या स्मरणात राहील. शमी छान खेळला! यंदाच्या विश्वचषकात शमीने सहा सामन्यांत २३ बळी घेतले आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. सेमीफायनलच्या महामुकाबल्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून फलंदाजी करत ३९७ धावांची मोठी धावसंख्या उभारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ ३२% धावांवर गडगडला. भारतीय संघाचा यंदाच्या विश्वचषकातील हा सलग १० वा विजय आहे.



# भाऊबीजेच्या दिवशी शिरसट परिवाराच्या आनंदावर कोसळली वीज

## पोलीस अधिकाऱ्याच्या आत्महत्येच्या स्मृती ताज्या असतानाच पोलीस शिपायाची आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर**

**'दिवाळीचा सण, नाही आनंदाला तोटा' अशा आनंदमय पर्व साजरा होत असताना बुधवारी, भाऊबीजेच्या दिवशी शिरसट परिवाराच्या आनंदावर वीज कोसळली. सोलापूर पोलीस आयुक्तालयात सेवेत असलेल्या राहुल शिरसट या ३५ वर्षीय पोलीस कर्मचाऱ्याने रायफलने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. आनंद प्रकाश मळाले या पोलीस अधिकाऱ्याच्या आत्महत्त्येच्या आठवणी ताज्या असतानाच, पोलीस कॉन्स्टेबल राहुल शिरसट यांच्या आत्महत्त्येमुळे पोलीस वर्तुळात खळबळ माजणे स्वाभाविक आहे.**



सोलापूर पोलीस आयुक्तालयात सेवेत असलेले पोलीस कॉन्स्टेबल राहुल शिरसट यांनी केशवनगर पोलीस वसाहतीत बुधवारी सकाळी रायफलने स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. भाऊबीजेच्या दिवशी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास राहुल यांनी स्वत:वर गोळी झाडून स्वत:ची जीवनयात्रा संपविली. त्यांच्या आत्महत्त्येमागील नेमके कारण समजू शकले नाही. पो. कॉ.राहुल शिरसट हे पोलीस आयुक्त यांच्या निवासस्थानी गार्ड म्हणून कार्यरत होते, अशी पोलीस वर्तुळात चर्चा आहे.

गार्ड म्हणून कर्तव्य बजावत असलेले राहुल शिरसट यांच्याकडे सुरक्षेच्या कारणासाठी नेहमी एसएलआर रायफल असायची. ते ड्युटी संपल्यानंतर रायफल जमा करायचे, मात्र बुधवारी सकाळी ड्युटी संपल्यानंतर राहुल यांनी रायफल जमा न करता, रायफल केशवनगर पोलिस वसाहतीतील त्यांच्या राहत्या घरी घेऊन गेले. त्यांनी राहत्या घरी हनुवटीवर रायफल ठेवून ट्रिगर दाबला असावा, असा कयास आहे. रायफल फायरींगच्या आवाजाने केशवनगर पोलीस वसाहत हादरली. भाऊबीज असल्याने केशव नगर पोलीस वसाहतीत मोठ्या आनंदाचे वातावरण होते. पोलीस वसाहतीत रायफलची गोळी झाडल्याचा आवाज आल्यावर आजूबाजूला राहत असलेल्या पोलिसांनी राहुल यांच्या रूमकडे धाव घेतली. त्यावेळी राहुल शिरसट हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. ते दृश्य पाहताचं प्रत्यक्षदर्शींना मोठा धक्का बसला. पोलीस वसाहतील दिवाळीचा आनंद अन् भाऊबीजेची लगबग क्षणात लोप पावली.

सोलापूर शहर पोलीस दलातील एका पोलीस कॉन्स्टेबलने आत्महत्या केली, हा प्रकार समजताच सोलापूर पोलीस आयुकक्तालयात एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच सदर बझार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन राहुल शिरसट यांना जखमी अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी राहुल शिरसट त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. राहुल शिरसट हे २०११ साली मुंबई पोलीस दलात भरती झाले होते. २०१७ साली सोलापूर शहर पोलीस दलात त्यांची बदली झाली. राहुल शिरसट सोलापूर शहर पोलीस दलात बदली होऊन आल्यानंतर सदर बझार पोलीस ठाण्यात त्यांची नियुक्ती झाली होती. पुढे प्रशासकीय कारणास्तव राहुल यांची बदली मुख्यालयात झाली होती. पोलीस आयुक्त यांच्या बंगल्यावर अनेक महिन्यांपासून राहुल सुरक्षा गार्ड म्हणून कार्यरत होते. राहुल यांचे वडील सोलापूर पोलीस दलात अनेक वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले आहेत.राहुल यांचा भाऊदेखील सोलापूर शहर पोलीस दलात कार्यरत आहे. तर राहुल यांची पत्नी सोलापूर ग्रामीण पोलीस दलात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत आहे. राहुल यांची बहीण महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी आहे. अख्खे कुटुंब पोलीस दलात कार्यरत असलेल्या राहुल यांनी भाऊबीजेला टोकाचा निर्णय घेत आत्महत्या केली. त्यांच्या आत्महत्येमागील पुढं आलं नसलं तरी त्याचा शोध हे पोलीस दलासमोरील एक आव्हानच आहे.

### गेल्या दोन महिन्यातील दुसरी घटना

यापूर्वी नांदेड पोलीस दलातील सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद मळाले यांनी सोलापुरातील कुमठा नाका येथील राहत्या घरी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. ही घटना दि. ७ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली होती. त्याच्या स्मृति ताज्या असतानाच, सोलापूर पोलीस आयुक्तालयातील पोलीस कॉन्स्टेबल राहुल शिरसट यांनी बुधवारी सकाळच्या सुमारास रायफलमधून गोळी झाडून आत्महत्या केली. दोन महिन्यांत दोन पोलिसांनी राहत्या घरी सर्व्हिस रिव्हॉल्व्हर आणि रायफलमधून आत्महत्या केल्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद मळाले यांनी लिहिलेल्या संदेशात (सुसाईड नोट म्हणूया) वरिष्ठांच्या त्रासाचे कारण लिहिले होते. पोलीस कॉन्स्टेबल राहुल शिरसाट यांच्या आत्महत्या मागील कारण शोधणे, हे तपासातील एक आव्हानच आहे.

## जन्मदात्या बापाचा मुलानेच काढला काटा

### आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी

**सुराज्य/सोलापूर**



दारूच्या नशेत घरातील लोकांना त्रास देणाऱ्या वडीलाचा कट रचून खून केला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह घाटात फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची घटना कोंडबावी (ता.माळशिरस) येथे उघडकीस आली.

या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी करून मयताचा मुलगा, मुलगी आणि पत्नी या तिघांना अटक केली. त्यांना सात दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश माळशिरसच्या न्यायालयाने गुरुवारी दिला आहे. पांडुरंग चंद्रकांत सावंत (वय- ४८, रा. कोंडबावी, ता.माळशिरस) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांचा खून केल्याप्रकरणी मुलगा सुरज पांडुरंग सावंत( वय२४), त्याची मुलगी प्रतिक्षा सावंत (वय २१) आणि मयताची पत्नी संगिता सावंत (वय ४२, सर्व रा.कोंडबावी ता.माळशिरस) या तिघांना पोलिसांनी अटक केली. त्यांना दि. २३ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. यातील मयत पांडुरंग सावंत हा इलेक्ट्रिशियनचे काम करीत असून, त्याला दारू पिण्याचे व्यसन होते. तो दररोज मद्य प्राशन करून घरातील लोकांना मारहाण आणि त्रास देत होता. त्यामुळे घरातील मंडळी त्याच्यावर चिडून होते. १३ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास मयत पांडुरंग हा दारू पिऊन घरी आला आणि घरातील लोकांना शिवीगाळ करण्यात सुरू केली. त्यावेळी मुलगा सुरज याने संगनमताने लोखंडी खिळीने मारून वडीलांचा खून केला.

दुसऱ्या दिवशी अनोळखी मृतदेह घाटात आढळला. त्याच्या खिशात आढळलेल्या चिट्ठीवरून मयताची ओळख पटली. त्यावेळी मयताचा मुलगा सुरज सावंत याने आपल्या वडीलाचा खून अनोळखी लोकांनी अज्ञात कारणावरून केल्याची फिर्याद नातेपुते पोलिसात दिली होती.

### मृतदेह पिशवीत भरुन घाटाता फेकून दिला

मुलगा सुरज याने वडीलांचा मृतदेह मोठ्या पिशवीत भरून स्वतच्या पिकअपमध्ये टाकून घरापासून ३० ते ३५ किमी अंतरावरील पिंपरी येथील शिंगणापूर, नातेपुते येथे असलेल्या भवानी घाटात फेकून दिला. त्यावेळी प्रतिक्षा ही वडिलांची दुचाकी सोबत घेऊन ती घाटात टाकून दिली. त्यानंतर दोघे बहिण भाऊ त्याच पिकपमधून घरी परतले होते.

## पत्नीला नांदवत नसल्याने तरुणाचा खून

**करमाळा** : पत्नीला नीट नांदवत नसल्याच्या कारणावरून बेदम मारहाण करून तरुणाचा गळफास देऊन खून करण्यात आला. ही घटना वीट (ता. करमाळा) घडली. मजऱ्या उर्फ मजीत शिवाजी काळे (वय २६ रा.वीट ता.करमाळा) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी जयभ्या हुनाजी पवार, याची पत्नी सुनीताबाई पवार, दहिवजीत पवार आणि अमोल पवार ( र्व रा.वीट ता.करमाळा) या चौघाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात मयताचे वडील शिवाजी काळे (वय ६५ रा.सरपडोह ता.करमाळा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक बंडगर करीत आहेत.

## हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री मांडणार आरक्षणाचा मुद्दा

**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सध्या मराठा आरक्षणाचा मुद्दा सोडवणं जास्त गरजेचं असल्याचं दिसतयं. कारण २४ डिसेंबर रोजी मनोज जरांगे पाटलांनी सरकारला दिलेलं अल्टिमेटम संपणार आहे. त्यातच येत्या ७ डिसेंबरपासून विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशानाला सुरुवात होणार आहे.



त्यातच अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे ८ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री शिंदे आरक्षणाच्या मुद्द्यावर विधीमंडळात बोलणार असल्याची माहिती देण्यात आलीये. महायुतीकडून कायदेशीररित्या सध्या मराठा आरक्षणाचा अभ्यास केला जात आहे. एकीकडे मनोज जरांगे पाटील यांनी २४ डिसेंबरची डेडलाइन दिलीये. तर दुसरीकडे ८ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोणती भूमिका मांडणार हे पाहणं जास्त महत्त्वाचं ठरेल. राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटला आणि संपूर्ण सरकार कामाला लागल्याचं पाहायला मिळालं. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दसरा मेळाव्यात व्यासपीठावरच छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेत मराठ्यांना आरक्षण देणारच अशी भूमिका जाहीर केली. त्यानंतर मराठा समाजाच्या अपेक्षा देखील उंचावल्या.

## पिराची कुरोली येथे अपघात; तरुण ठार

**सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात पिराची कुरोली (ता.पंढरपूर) येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास घडला.

निलेश सिद्धेश्वर लवटे (रा.गादेगाव) असे मयताचे नाव आहे. काल पहाटे ५ वाजेच्या सुमारास तो आपल्या दुचाकीवरून पंढरपूर ते वेळापूरच्या दिशेने निघाला होता. पिराची कुरोली येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने तो गंभीर जखमी होऊन मरण पावला. या अपघाताची फिर्याद मयताले मामा विठ्ठल कोळेकर यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात दाखल केली. पोलिसांनी अनोळखी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार कर्चे पुढील तपास करीत आहेत.

## उजनी धरण आले ४५ टक्क्यांवर

**सुराज्य/सोलापूर**



उजनी धरणातून अजूनही डाव्या कालव्यातून २%०० क्यूसेक वेगाने पाणी सोडणे सुरूच आहे. पाण्याचे योग्य पद्धतीने वितरण केले जात असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये परिस्थिती गंभीर होणार आहे. सध्या उजनी धरणातील पाणीपातळी अवघ्या ४५ टक्क्यावर आली आहे.

आता सोलापूर महापालिकेला डिसेंबर महिन्यात पिण्यासाठी नदीद्वारे पाणी सोडावे लागेल. शिवाय पुन्हा फेब्रुवारी मार्चमध्ये पाणी सोडावे लागेल. त्यानंतर धरण मायनसमध्ये येईल. लोकप्रतिनिधींनी उजनी धरण पाणी वाटपाचा बट्ट्याबोळ केल्यामुळे १२३ टीएमसी एवढा महाकाय पाणीसाठा असणाऱ्या सोलापूर जिल्ह्याला दुष्काळाचा सामना करावा लागतो.

## बिल देण्याच्या कारणावरून डोळ्यात तिखट टाकून मारहाण

### हॉटेल चालकासह चौघांवर गुन्हा दाखल

**मंगळवेढा** : जेवणाचे बिल देण्याच्या कारणावरून ग्राहकाच्या डोळ्यात तिखट टाकून काठी आणि बेल्टने मारहाण केल्याची घटना भाळवणी (ता.मंगळवेढा) येथील फौजी धाब्यामध्ये घडली.



पोलिसांनी धाब्याच्या चालकासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात सिद्धेश्वर भारत गायकवाड (वय-३४) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी हॉटेलचा चालक शिवराज पाटील, स्वप्निल शिंदे, समर्थ पाटील आणि योगेश माने या चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सिद्धेश्वर गायकवाड हे १० नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास फौजी धाब्यामध्ये जेवण करून त्याचे उरलेले पैसे परत मागितले होते. त्यावेळी तुला दम नाही का? पैसे देतो की, असे म्हणत हॉटेल चालक पाटील याच्यासह चौघांनी त्यांच्या डोळ्यात तिखट टाकून मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. तपास हवालदार कोळी करीत आहेत .

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




रात्रौ आठ ते दहा !

# भारत-ऑस्ट्रेलियामध्ये रंगणार फायनलचा थरार

## दक्षिण आफ्रिका ठरली पुन्हा चोकर्स

**कोलकाता** : रंगलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने आफ्रिकेचा तीन विकेटने पराभव करत फायनलमध्ये धडक मारली. आफ्रिकेने दिलेल्या २१३ धावांच्या माफक आव्हनाचा कांगारुंनी यशस्वी पाठलाग केला. आता रविवारी, १९ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियाचा संघ भारतासोबत फायनलमध्ये भिडणार आहे.. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये विश्वचषकाचा अंतिम सामना रंगणार आहे. दरम्यान, आफ्रिकेच्या फिल्डर्सनी गचाळ फिल्डिंग करत ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना सात ते आठ जीवनदान दिले. त्याचा मोठा फटका आफ्रिकेला बसला.

ऑस्ट्रेलियाने आठव्यांदा फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आतापर्यंत ऑस्ट्रेलियाने पाचवेळा विश्वचषकावर नाव कोरले आहे. १९८७, १९९९, २००३, २००७ व २०१५ हे विश्वचषक ऑस्ट्रेलियाने उंचावले आहेत. १९७५ आणि १९९६ मध्ये ऑस्ट्रेलियाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. सेमीफायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेचा चौथ्यांदा पराभव झालाय. तर एकवेळा सामना बरोबरीत सुटला होता. दक्षिण आफ्रिकेने पाच वेळा उपांत्य फेरी गाठली, पण त्यांना एकदाही फायनलमध्ये प्रवेश करता आला नाही.







आफ्रिकेने दिलेल्या २१३ धावांच्या माफक आव्हानाचा ऑस्ट्रेलियाने वेगाने पाठलाग केला. ट्रेविस हेड आणि डेविड वॉर्नर यांनी आफ्रिकेची गोलंदाजी फोडून काढली. दोघांनी ६.१ षटकात ६० धावांचा पाऊस पाडला. डेविड वॉर्नरने चार षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने १८ चेंडूत झटपट २९ धावा चोपल्या. डेविड वॉर्नरला एडन मार्करम याने तंबूचा रस्ता दाखवला. वॉर्नर बाद झाल्यानंतर मिचेल मार्शही फार काळ टिकला नाही. त्याला खातेही उघडता आले नाही. रबाडाच्या चेंडूवर मार्श गोल्डन डकचा शिकार झाला. दोन विकेट गेल्या तरी ट्रेविस हेडची फटकेबाजी सुरुच होती. ट्रेविस हेड याला स्टिव्ह स्मिथ याने चांगली साथ दिली. फिरकीला मदत मिळणाऱ्या खेळपट्टीवर ट्रेविस हेड याने वेगवान धावा जमवल्या. हेड याने ४८ चेंडूत ६२ धावांची खेळी केली. यामध्ये ९ चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. हेड आणि स्मिथ यांच्यामध्ये ४५ धावांची भागिदारी झाली.